RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष २, अंक १०५ (२)] शनिवार, ऑगस्ट २०, २०१६/श्रावण २९, शके १९३८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २१५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ जुलै २०१६

**आदेश**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम.**

क्रमांक आरसीटी-०३१२/प्र.क्र. २८८/पुनर्बांधणी-१६६/पोल-५अ.— मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा २२) च्या कलम-५ब आणि त्या अनुषंगाने प्रदान करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि या संदर्भात अस्तित्वात असलेले पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे :—

१. या नियमांना " महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०१६ " असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ (ज्यास यापुढे मुख्य नियम असे संबोधण्यात आले आहे) मधील नियम ३ (१) (क) नंतर खालीलप्रमाणे उपखंड (ड) समाविष्ट करण्यात यावा :—

" (ड) अन्य अर्हता-पोलीस भरतीमध्ये पोलीस शिपाई पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम २ (२१) नुसार हलकी वाहने चालविण्याचा (LMV) परवाना धारण केला असणे आवश्यक आहे. परंतु, सदर परवाना धारण न करणाऱ्या उमेदवाराने नियुक्तीनंतर त्याचे पोलीस प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर दोन वर्षांच्या आत परवाना धारण करण्यात येईल व या कालावधीत हा परवाना धारण न केल्यास निवड रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यात येतील. याबाबतचे बंधपत्र सादर केल्यास असा उमेदवार या पदासाठी अर्ज करण्यास पात्र राहील. "

३. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ३ (२) (अ) मधील (ब) (i) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

" उंची : ४.०० से.मी. महिला व पुरुष उमेदवारांसाठी "

४. मुख्य नियमाच्या नियम १२ नंतर खालील नियम, नियम १३ म्हणून अंतर्भूत करण्यात यावा :—

"नियम १३ : नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त व्यक्तीने शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे, संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे."

५. मुख्य नियमातील नियम १३ हा नियम १४ म्हणून संबोधण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुरेश खाडे,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

2nd Flr., Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 27th July 2016

## Order

MAHARASHTRA POLICE ACT.

No. RCT.0312/CR 228/Reconstruction-166/Pol-5A.— In exercise of the powers conferred by clause (*b*) of section-5 of the Maharashtra Police Act (XXII of 1951), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra makes the following rules further to amend the Maharashtra Police Constable (Recruitment) Rules, 2011, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Police Constables (Recruitment) (Amendment) Rules, 2016.

2. In rule 3 of the Maharashtra Police Constable (Recruitment) Rules, 2011 (hereinafter referred to as "the Principal Rules") in sub-rule (i) after clause (*c*) the following clause shall be inserted namely :—

"(D) Other qualification—A candidate who apply to the post mentioned in Rule 3 is required to possess Light Motor Vehicle (LMV) license as prescribed in section 2 (21) of Motor Vehicle Act, 1988 issued by Competent Authority (Regional Transport Officer) at the time of submitting application. Provided, a candidate who does not possess such license, he/she shall be required to possess a license within two year after completion of his/her training and if he/she fails to possess the license, then his/her appointment will be considered as cancelled and he/she shall be liable to be terminated from service."

3. In rule 3 of the Maharashtra Police Constables (recruitment) Rules, 2011, in sub-rule (2) in clause (*A*), for sub-clause (*b*) (*i*), the following sub-clause shall be substituted, namely:—

"Height : 4.00 centimeters for male and female candidates."

4. After rule 12 of the Principal Rules, the following rule shall be inserted as a Rule 13 namely :—

"Rule 13 : A person appointed to the post mentioned in rule 3 shall be required to possess a certificate in Computer Operation prescribed by the Directorate of Information Technology, Government of Maharashtra, from time to time."

5. Rule 13 of the Principal Rules shall be renumbered as Rule 14.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SURESH KHADE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI